सत्यमेव जयते

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८,क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे-४११००१
Website: trti.maharashtra.gov.in
दुरध्वनी- ०२०-२६३३०८५४

जा.क्र./आसंप्रसं/२०२६/स्पर्धा परीक्षा/कागदपत्रे तपासणी/का.०४/ १११५ दि.२१/०२/२०२६

## महत्वाची सूचना

**सन २०२५-२६ स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत सामायिक चाळणी प्रवेश परीक्षांमधून केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) - नागरी सेवा परीक्षा (दिल्ली व महाराष्ट्र), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - राज्यसेवा, अभियांत्रिकी सेवा, विधी/न्यायिक सेवा, PSI/STI/ASO, अराजपत्रित गट क सेवा, महाराष्ट्र शिक्षण पात्रता परीक्षा (TET), बँक (IBPS), रेल्वे, नाबार्ड, एलआयसी इ. व तत्सम स्पर्धा परीक्षा आणि स्टाफ सिलेक्शन कमिशन (SSC) या पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत तात्पुरती निवड झालेल्या उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची तपासणी (Original Document Verification) व Biometric/ Face Recognition नोंदणीची (Onetime Registration) प्रक्रिया आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या कार्यालयामार्फत करण्याबाबत..**

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी सन २०२५-२६ मध्ये राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांच्या लाभार्थी निवडीकरीता घेण्यात आलेल्या केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) - नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण (दिल्ली व महाराष्ट्र), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - राज्यसेवा, अभियांत्रिकी सेवा (MES), विधी/न्यायिक सेवा (JMFC), PSI/STI/ASO, अराजपत्रित गट क सेवा, बँक (IBPS), रेल्वे, नाबार्ड, एलआयसी इ. व तत्सम स्पर्धा परीक्षा, स्टाफ सिलेक्शन कमिशन (SSC) - वर्ग ३ पदांकरीता परीक्षा आणि महाराष्ट्र शिक्षण पात्रता परीक्षा (TET) या पूर्व प्रशिक्षण योजनांकरीता सामायिक चाळणी प्रवेश परीक्षा (CET) २०२५-२६ द्वारे गुणवत्ता / निवड व प्रतिक्षा यादीतील (Merit list & Waiting List) मधील उमेदवारांना दि.१६/०२/२०२६ ते दि.२२/०६/२०२६ पर्यंत प्रशिक्षण देणाऱ्या नामनिर्देशित प्रशिक्षण संस्थांची निवड करण्यासाठी ऑनलाईन पोर्टलद्वारे विकल्प देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. सदर ऑनलाईन पोर्टलच्या माध्यमातून उमेदवारांनी निवडलेल्या प्रशिक्षण संस्थेबाबतची Preference cum Receipt व Original Document Verification Slip उमेदवारांना त्यांच्या वैयक्तिक लॉगीनद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. ज्या उमेदवारांना प्रशिक्षण संस्था निवडीची Original Document Verification Slip मिळाली आहे अशा उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी **दि.२७/०२/२०२६ ते दि.०४/०३/२०२६** या कालावधीत **स.९.०० ते सायं.६.००** या वेळेत करण्यात येणार आहे. त्याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे –

| अनु. क्र. | पूर्व प्रशिक्षण योजनेचे नाव | दिनांक |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - अभियांत्रिकी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.२७/०२/२०२६ |
| २ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - विधी/न्यायिक सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.२७/०२/२०२६ |

| अनु. क्र. | पूर्व प्रशिक्षण योजनेचे नाव | दिनांक |
|---|---|---|
| ३ | स्टाफ सिलेक्शन कमिशन (SSC) - वर्ग ३ पदांकरीता परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.२८/०२/२०२६ |
| ४ | बँक (IBPS), रेल्वे, नाबार्ड, एलआयसी इ. व तत्सम स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.२८/०२/२०२६ |
| ५ | PSI / STI/ ASO परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.०१/०३/२०२६ |
| ६ | महाराष्ट्र शिक्षण पात्रता परीक्षा (TET) परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.०१/०३/२०२६ |
| ७ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - राज्यसेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.०२/०३/२०२६ |
| ८ | केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) - नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण (दिल्ली व महाराष्ट्र) | दि.०२/०३/२०२६ |
| **दि.०३/०३/२०२६ रोजी होळी निमित्त सुट्टी** | | |
| ९ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - अराजपत्रित गट क सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.०४/०३/२०२६ |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे पूर्व प्रशिक्षण योजनानिहाय उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येणार आहे. **जे उमेदवार उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या दिवशी मूळ कागदपत्रे तपासणी करीता उपस्थित राहणार नाहीत अशा उमेदवारांची निवड रद्द करून प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना संधी देण्यात येईल. याबाबत कोणतेही निवेदन किंवा विनंती अर्ज/ई-मेल स्वीकारण्यात येणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

- **कागदपत्रे तपासणी करीताचे ठिकाण –**

  **डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), येरवडा संकुल,**
  **४, कॉमरझोन आयटी पार्क, जेल रोड, येरवडा, पुणे – ४११००६**
  **https://maps.app.goo.gl/YALF3k546TnD3oBG8**

**अत्यंत महत्वाचे –**

१. जे उमेदवार **दि.२७/०२/२०२६ ते दि.०४/०३/२०२६** कालावधीमध्ये मूळ कागदपत्रे तपासणी करीता उपस्थित राहणार नाहीत अशा उमेदवारांची निवड रद्द करून प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना संधी देण्यात येईल.

२. कागदपत्रे तपासणी करीता उमेदवारांनी सदर सूचना पत्रकासोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** मध्ये नमूद केलेल्या सर्व कागदपत्रांची मूळ प्रत व प्रत्येकाच्या सुस्पष्ट छायांकित (झेरॉक्स) प्रतींचा एक संच व **स्वयंघोषणापत्रकाची प्रत (परिशिष्ट-ब)** घेऊन येणे बंधनकारक असेल.

३. **ज्या उमेदवारांनी ऑनलाईन पोर्टलद्वारे प्रशिक्षण संस्थेची निवड केली आहे अशा उमेदवारांचा मूळ कागदपत्रे पडताळणी व Biometric/ Face Recognition नोंदणी (Onetime Registration) अंतीच प्रवेश निश्चित समजण्यात येईल. तद्नंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना संधी देण्यात येईल, याची सर्व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

४. उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांच्या पडताळणी दरम्यान कागदपत्रे कमी/अपूर्ण अथवा चुकीचे आढल्यास सबंधित उमेदवाराचा प्रवेश रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना राहतील.

(चंचल पाटील)
**आयुक्त,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**

प्रत माहितीस्तव –

**सर्व नामनिर्देशित प्रशिक्षण संस्था प्रमुख यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.**

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आपल्या प्रशिक्षण संस्थेने प्राधिकृत केलेले १ किंवा २ कर्मचारी यांना वरील कागदपत्रे तपासणीच्या ठिकाणी विहित कालावधीत व दिलेल्या वेळेत लॅपटॉप, स्कॅनर व प्रिंटर सहित विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्रांची तपासणी (Original Document Verification) व Biometric/ Face Recognition नोंदणी (Onetime Registration) प्रक्रीयेकरीता उपस्थित राहण्यास अवगत करावे. याबाबत काही शंका असल्यास संबंधित स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेच्या समन्वयकांशी संपर्क साधावा.

सत्यमेव जयते

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**२८,क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे-४११००१**
**Website: trti.maharashtra.gov.in**
**दुरध्वनी- ०२०-२६३३०८५४**

## परिशिष्ट - अ : कागदपात्रांची यादी

| अनु. क्र. | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|
| १ | ऑनलाईन पोर्टलच्या माध्यमातून प्रशिक्षण व प्रशिक्षण संस्था निवडल्याबाबतची Original Document Verification Slip |
| २ | २ पासपोर्टच्या आकाराचे फोटो |
| ३ | दहावी गुणपत्रिका / प्रमाणपत्र |
| ४ | बारावी गुणपत्रिका / प्रमाणपत्र |
| ५ | पदवी गुणपत्रिका / प्रमाणपत्र |
| ६ | अनुसूचित जमातीचे मूळ प्रमाणपत्र (Tribe Certificate) |
| ७ | अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र (Tribe Validity Certificate) |
| ८ | महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) |
| ९ | आधार कार्डची सुस्पष्ट प्रत |
| १० | आधार सीडिंग (Aadhaar Seeding) असलेले उमेदवाराचे बँक पासबुक किंवा धनादेशाची (Cancelled Cheque) सुस्पष्ट प्रत |
| ११ | दिव्यांगत्वाचा दाखला (लागू असल्यास)<br>(शासनाच्या सक्षम प्राधिकारी यांनी वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या नमुन्यातील वैध दिव्यांगत्वाबाबतचे प्रमाणपत्र (Certificate of Disability) असावे.) |
| १२ | अनाथ असल्याचा दाखला (लागू असल्यास)<br>(उपायुक्त महिला व बाल विकास आयुक्तालय यांनी निर्गमित केलेला दाखला असावा.) |
| १३ | वयाच्या पुराव्यासाठी : जन्मदाखला, दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्र, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड यापैकी कोणतेही एक कागदपत्र. |
| १४ | वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा कमी असलेला तहसीलदार कार्यालयातून निर्गमित केलेला उत्पनाच्या मूळ दाखल्याची प्रत (आर्थिक वर्ष २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ या तीन वर्षाचा एकत्रित किंवा आर्थिक वर्ष २०२४-२५) |
| १५ | स्वयंघोषणापत्रकाची प्रत (परिशिष्ट-ब) |

**टीप** – उमेदवारांनी उक्त **परिशिष्ट-अ** मध्ये नमूद केलेल्या सर्व कागदपत्रांची मूळ प्रत व प्रत्येकाच्या सुस्पष्ट छायांकित (झेरॉक्स) प्रतींचा एक संच घेऊन येणे बंधनकारक असेल.

**<u>परिशिष्ट – ब</u>**

**स्वयंघोषणापत्र**

मी ........................................................................ सत्य प्रतिज्ञेवर सांगतो / सांगते की, मी सन २०२५-२६ या कालावधीत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठीच्या ...............................................................योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक असून मी कोणत्याही भौतिक अमिषाला किंवा इतर प्रलोभनाला बळी न पडता माझ्या स्वेच्छेने ................................................... या खाजगी प्रशिक्षण संस्थेची निवड केली आहे व त्यानुसार मी माझा प्रवेश निश्चित करत आहे.

**<u>प्रशिक्षण योजनेच्या अटी व शर्ती -</u>**

१. सदरची अनिवासी प्रशिक्षण योजना प्रशिक्षण सुरु झाल्यापासूनच्या पुढील ११ महिने / ०६ महिने महिन्यांकरीता आहे. या प्रशिक्षण योजनेकरीताच्या विद्यावेतनासाठी किमान उपस्थिती ७५% असणे बंधनकारक आहे याची मला जाणीव आहे. या नियमानुसार मी उपरोक्त नमूद प्रशिक्षण संस्थेत माझ्या इच्छेनुसार प्रवेश घेत आहे.

२. सदरचा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम हा ऑनलाईन स्वरूपाचा नसून तो ऑफलाईन व नियमित स्वरूपाचा आहे त्यामुळे प्रशिक्षण वर्गाला उपस्थित राहून प्रशिक्षणाचा लाभ घेणे बंधनकारक असल्याची मला जाणीव असून मी प्रत्यक्ष प्रशिक्षण वर्गात उपस्थित राहील. प्रशिक्षण संस्थेकडे ऑनलाईन प्रशिक्षण देण्याची मागणी केल्याचे आढळून आल्यास माझा प्रवेश रद्द होईल याची मला जाणीव आहे.

३. प्रशिक्षण संस्थेकडून प्रशिक्षण काळात दर महिन्याचे ऑनलाईन हजेरी (बायोमेट्रिक उपस्थिती पत्रक) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेस प्राप्त झाल्यावर त्याची पडताळणी करून DBT द्वारे माझ्या बँक खात्यावर विद्यावेतनाची रक्कम जमा केली जाईल यास माझी काही हरकत नाही. तसेच प्रशिक्षण कालावधी दरम्यान सबळ कारणास्तव (आजारपण, परीक्षा इ.) मला रजा घ्यावयाची असल्यास मी प्रशिक्षण संस्थेस लेखी अर्ज सादर करून त्याबाबतची पूर्व परवानगी घेईल. जर मी पूर्व परवानगी न घेता प्रशिक्षण वर्गास अनुपस्थित राहिल्यामुळे जर महिन्याची उपस्थिती किमान ७५% न भरल्यास त्या महिन्याच्या विद्यावेतनास अपात्र ठरेल, याची मला जाणीव आहे.

४. मी कागदपत्र पडताळणी दरम्यान सादर केलेले अनुसूचित जमातीचे जमात वैधता प्रमाणपत्र, इतर सर्व कागदपत्रे व भरून दिलेली माहिती ही खरी आहे. जर तपासणीअंती काही खोटे आढळल्यास माझा प्रवेश रह होऊ शकतो याची मला जाणीव आहे. तसेच दरम्यानच्या काळात घेतलेले सर्व लाभ मी परत करेन व पुढील कायदेशीर कार्यवाहीस मी पात्र राहीन.

५. मी यापूर्वी केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) - नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण (दिल्ली व महाराष्ट्र) योजनेचा लाभ घेतलेला नाही. जर लाभ घेतल्याचे तपासणीअंती निदर्शनास आल्यास माझा सदर योजनेकरीताचा प्रवेश रद्द होईल याची मला जाणीव आहे. तसेच दरम्यानच्या काळात घेतलेले सर्व लाभ मी परत करेल.

६. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजनांकरीता काठीण्य पातळीनुसार चढत्या क्रमाने (वर्ग-४ < वर्ग-३ < वर्ग -२ < वर्ग - १) घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमासाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवाराने पूर्वी तुलनेने कमी काठीण्य पातळी पूर्व प्रशिक्षणाचा लाभ घेतला असेल तर संबंधित उमेदवाराला चढत्या क्रमाने प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रवेशास पून:श्च केवळ एकदाच लाभ घेता येईल. सदर निर्णयाबाबत मला अवगत आहे.

७. प्रशिक्षण योजनेच्या कालावधी दरम्यान मी कुठेही शासकीय / निमशासकीय नोकरी करणार नाही. तसे आढळल्यास किंवा याबाबत आपल्या कार्यालयास काही तक्रार प्राप्त झाल्यास माझा प्रवेश रद्द करण्यात येईल. याला माझी हरकत नसेल.

८. प्रशिक्षण योजनेच्या कोणत्याही टप्प्यावर प्रशिक्षण सोडवायचे असल्यास मी घेतलेले सर्व लाभ, दरम्यानच्या काळात प्रशिक्षण योजनेकरीता माझ्यावर झालेला सर्व खर्च आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेला परत करेल. तसे न केल्यास कायदेशीर आणि दंडात्मक कारवाईस पात्र राहीन.

९. माझी शासकीय/निमशासकीय सेवेत निवड झाल्यास मी प्रशिक्षण संस्थेला व आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेला तात्काळ कळवेन.

१०. सदर स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजनेदरम्यान माझ्या आरोग्याची व सुरक्षिततेची जबाबदारी मी स्वतः घेईन.

११. प्रशिक्षण योजनेच्या कालावधी दरम्यान माझ्याकडून कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन होणार नाही. मी प्रशिक्षण संस्थेतील सर्व नियमांचे व शिस्तीचे पालन करीन. इतर व्यक्तीला व संस्थेला त्रास होणार नाही याची मी काळजी घेईन, तसेच प्रशिक्षण कालावधीमध्ये धुम्रपान/अंमली पदार्थाचे सेवन, मद्यपान, उद्धट वर्तन असे कोणतेही गैर प्रकार केल्यास माझी निवड रद्द करण्यात येईल व कायदेशीर आणि दंडात्मक कारवाईस पात्र राहील याची मला जाणीव आहे.

१२. प्रशिक्षण काळात प्रशिक्षणाबाबत आढावा, नियंत्रण इ. बाबीविषयी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मधील अधिकारी/कर्मचारी यांना माहिती अवगत करण्याचे तसेच त्यांना सहकार्य करण्याची हमी देतो/देते.

१३. सदरच्या प्रशिक्षण योजनेकरीता निवड झाल्यानंतर मी प्रशिक्षणासाठी तात्काळ रुजू होईल. जर मी दिलेल्या तारखेपासून ०५ दिवसाच्या आत रुजू झालो/झाले नाही अथवा आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेशी किंवा प्रशिक्षण संस्थेशी उशिरा रुजू होण्याबाबत संपर्क केला नाही तर माझ्याऐवजी निवड यादीतील किंवा प्रतीक्षा यादीतील उमेदवाराची निवड केल्यास माझी हरकत नाही.

मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो/देते की, उपरोक्त नमूद प्रशिक्षण योजनेच्या सर्व अटी-शर्ती व वेळोवेळी आपल्या कार्यालयाकडून दिलेल्या सर्व सूचना मला मान्य आहेत.

प्रशिक्षाणार्थ्याची स्वाक्षरी : ..............................................................

प्रशिक्षाणार्थ्याचे संपूर्ण नाव : ..............................................................

भ्रमणध्वनी क्र. (मोबाईल क्र.) : ..............................................................

आधारकार्ड क्र. : ..............................................................

कायमचा पत्ता : ..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................